**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०४/२०१० मधील निशाणी क्रमांक १०१ वरील आदेश.**

**१.** वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी केला आहे.

**२.** वादींचे म्हणणे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हक्क ज्ञापनेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तथापी, दावा प्रलंबित असते वेळी, प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी प्रतिवादी क्रमांक २० यांच्या लाभात वाद मिळकत क्रमांक १ ब पैकी २६.५ आर क्षेत्र खरेदी दिलेले आहे. प्रस्तुतचा व्यवहार हा दावा प्रलंबित असते वेळी केला असल्याने तो मुळातच बेकायदेशीर आहे. सबब, झालेल्या व्यवहाराच्या अनुषंगाने वादपत्र कलम ६-ब व कलम १२-अ-२ येथे वादी यांनी हक्क ज्ञापनाची नियोजीत दुरूस्ती मंजुर होण्यास विनंती केलेली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक १०८ येथे म्हणणे दाखल करून अर्जास जोरदार आव्हान दिलेले आहे. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे वादी यांना नियोजीत व्यवहाराबाबत सन २०१५ मध्येच माहिती प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतीशी वादी यांचा काहीही संबंध नसून केवळ वडीलांचे नाव सार्धम्यवरून वादी वाद मिळकतीत हक्क प्रस्थापित करू इच्छीतात. सबब, प्रतिवादी यांनी अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

**४.** प्रस्तुतचा दावा हक्क ज्ञापनासाठी दाखल करण्यात आलेला आहे. तथापी, दावा प्रलंबित असते वेळीच प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी प्रतिवादी क्रमांक २० यांच्या लाभात वाद मिळकत क्रमांक २ पैकी २६.५ आर क्षेत्राचे खरेदीखत करून दिलेले आहे. वाद मिळकतीमध्ये वादी यांना कोणताही हक्क प्राप्त होतो अगर कसे आणि वादातीत खरेदीखताबाबत वादी यांना पुर्वीपासूनच ज्ञान होते अगर कसे, हा मुद्दा दाव्याचे चौकशीअंती गुण दोषावर ठरणारा आहे. त्यामुळे नियोजीत दुरूस्ती ही दावा दाखल तारखेनंतरची बाब असल्याने दुरूस्ती मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. तथापी, प्रस्तुतचा दावा हा जुना असून वादातीत खरेदीखत सन २०१५ मधील असतांनाही वादींनी विलंबाने दुरूस्ती अर्ज दाखल केला असल्याने प्रस्तुत अर्ज विलंब खर्चाने मंजुर करणे आवश्यक ठरते. सबब, आदेश :-

## <u>आ दे श</u>

**१.** वार्दीनी खर्च दाखल रक्कम रूपये ४५०/- (अक्षरी रक्कम रूपये चारशे पन्नास मात्र) शासन जमा करण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी विहीत कालावधीत दाव्यात प्रस्तावित दुरूस्ती करावयाची असून दाव्याची दुरूस्त प्रत न्यायालयासाठी व प्रतिवार्दीसाठी अभिलेखावर सादर करावयाची आहे.

**३.** वादी यांनी खरेदीखताच्या अनुषंगाने मागितलेल्या नियोजीत दुरूस्तीबाबत आवश्यक तो न्यायालयीन मुद्रांक पुढील तारखेपर्यंत जमा करावयाचा असून त्याप्रमाणे दावा आकारणी कलमामध्ये योग्य ती दुरूस्ती करून घ्यावी.

**४.** खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

स्थळ :- संगमनेर.
दिनांक :- १९/०९/२०१९.

(प्र. श्री. शिंदे)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर.